# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे या कार्यालयामध्ये खालील पदांसाठी मे. सुमित फॅसिलीटीज लि. या बाह्य एजन्सी मार्फत कंत्राटी पध्दतीने अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावयाची आहे.

| अ. क्र. | विभागाचे नाव | पदाचे नाव | आवश्यक संख्या | पात्रता | अनुभव व कामाचे स्वरूप | वेतन (CTC) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मा. महानगर आयुक्त यांचे कार्यालय | मा. महानगर आयुक्त यांचे कार्यकारी सहायक | ०१ | मान्यता प्राप्त आणि नामांकित विद्यापीठासह कोणत्याही शाखेची पदवी. | **वयोमर्यादा -** (वय - किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार)<br>**अनुभव - किमान ५ वर्षाचा**<br>१. शासकीय कार्यपद्धती, नियम व कायद्यांचे ज्ञान असले पाहिजे. एम.एस वर्ड, एक्सेल आणि पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन (PPT), इत्यादींचे ज्ञान असावे.<br>२. पुरेसे दस्तऐवजीकरण आणि तांत्रिक लेखन कौशल्य असणे आवश्यक आहे.<br>३. वरिष्ठ आय.ए.एस. अधिकाऱ्यांशी आत्मविश्वासाने संवाद साधण्यास सक्षम.<br>४. इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषेची व्यावसायिकता असणे आवश्यक आहे.<br>**प्राधिकरण कार्यालयात करावयाच्या कामकाजाचे स्वरूप -**<br>१. मा. महानगर आयुक्तांना विविध धोरणात्मक उपक्रमांसाठी संशोधन आणि विश्लेषणामध्ये सहाय्य करणे.<br>२. मा. आयुक्तांच्या सूचनेनुसार विविध शासकीय विभागांशी समन्वय करणे.<br>३.मंत्रालय आणि भारत सरकार यांचे सचिवालयाशी समन्वय साधण्यास सक्षम. | ४५,०००/- |
| २ | नियोजन विभाग (२००० Watt carbon neutral Project ) | वरिष्ठ प्रकल्प सल्लागार | ०१ | एम.ई./एम.टेक (बांधकाम तंत्रज्ञान) | **वयोमर्यादा -** (वय - किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार)<br>**अनुभव -**किमान १० वर्ष | ९०,०००/- |

| अ. क्र. | विभागाचे नाव | पदाचे नाव | आवश्यक संख्या | पात्रता | अनुभव व कामाचे स्वरूप | वेतन (CTC) |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रशासन विभाग | सहायक जनसंपर्क अधिकारी | ०१ | मान्यता प्राप्त व नामांकित विद्यापीठाची मास कम्युनिकेशन किंवा जर्नालिझम मधील पदवी किंवा पदविका. | **वयोमर्यादा -** ३० - ४५ वर्ष<br>**अनुभव -** जनसंपर्क विभागामध्ये किमान ५ वर्षे काम केलेचा अनुभव असणे आवश्यक.<br>**प्राधिकरण कार्यालयात करावयाच्या कामकाजाचे स्वरूप -**<br>१. पत्रकार परिषदेचे आयोजन करणे व पत्रकारांशी संवाद साधणे.<br>२. प्रेस नोट तयार करणे, ती प्रसारित करणे व जास्तीत जास्त कव्हरेज सुनिश्चित करणे.<br>३. पीएमआरडीएच्या ध्येय, उदिष्ट्य, प्रकल्प आणि पीएमआरडीएच्या धोरणात्मक निर्णयाची जाहिरात करण्यासाठी वेगवेगळ्या वृत्तपत्रांच्या कार्यालयाशी समन्वय साधणे.<br>४. विद्यमान नसल्यास नवीन सोशल मीडिया खाती तयार करणे.<br>५. सोशल मिडिया पाने/वाहिन्या हाताळणे.<br>६. सामग्रीच्या डिझाइनसह प्रसारण, सामाजिक साधने / माध्यमांसाठी सर्जनशील रणनीती तयार करणे (फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब चॅनेल, ट्विटर, ईमेल, एसएमएस इ.)<br>७. उत्सवांसाठी किंवा विशेष प्रसंगी सर्जनशील पोस्ट / सर्जनशील टेम्पलेट्स, ऑडिओ व्हिडिओसाठी डिझाइन समर्थन प्रदान करणे.<br>८. नागरिकांची व्यस्तता आणि सहभाग वाढवण्यासाठी स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा तयार करणे. | ४०,०००/- |

| अ. क्र. | विभागाचे नाव | पदाचे नाव | आवश्यक संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव व कामाचे स्वरूप | वेतन (CTC) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९. योग्य माहिती लिहिण्यासाठी संबंधित विभागाच्या विभागप्रमुखांशी समन्वय साधणे.<br>१०. सामाजिक साधने / माध्यमांचा अहवाल देणे.<br>११. नागरिकांच्या समस्येबद्दल त्यांचे विश्लेषण टिप्पण्या / सोशल मीडियाला अभिप्राय देणे.<br>१२. वृत्तपत्रात प्रकाशित झालेले पीएमआरडीएशी संबंधित लेख वरिष्ठांच्या अवलोकनार्थ सादर केल्यानंतर जतन करून ठेवणे.<br>१३. वेबसाइटशी संबंधित सर्व कामांमध्ये समन्वयकाचे काम करणे.<br>१४. वरिष्ठांनी नेमून दिलेली कामे करणे.<br>१५. मीडियाशी संबंधित एसओपी (SOP) तयार करणे.<br>१६. कार्यालयाने ठरविलेले जाहिरात धोरण राबविणे. | |
| ४ | विधी विभाग | विधी अधिकारी | ०१ | १० वर्ष | **वयोमर्यादा -** (वय - किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार)<br>**एल.एल.बी.**<br>महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६, जमीन विषयक सर्व कायदे तसेच दिवाणी व फौजदारी संहितेशी संबंधित १० वर्षाचा वकिली/विधीविषयक कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक. | ७५,०००/- |

| अ. क्र. | विभागाचे नाव | पदाचे नाव | आवश्यक संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव व कामाचे स्वरूप | वेतन (CTC) |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | विकास परवानगी विभाग | सहायक वास्तुविशारद | ०४ | **शैक्षणिक पात्रता:-**<br>मान्यता प्राप्त व नामांकित विद्यापीठाकडून वास्तुविशारद किंवा स्थापत्य अभियांत्रिकी पदवी. (किमान व्दितीय श्रेणीसह) आणि एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र. | **वयोमर्यादा -** (वय - किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार)<br>**अनुभवः-** कोणत्याही सरकारी प्रकल्प, नामांकित बांधकाम फर्म किंवा नामांकित आर्किटेक्चरल फर्ममध्ये काम करण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव.<br>**प्राधिकरण कार्यालयात करावयाचे कामकाजाचे स्वरूप -**<br>• पीएमआरडीएने मंजूर केलेल्या इमारत परवानग्यांची छाननी.<br>• पीएमआरडीएकडे सादर झालेल्या लेआउटची छाननी करणे.<br>• शासनाच्या विविध संदर्भांना उत्तरे देणे.<br>• जोते तपासणी दाखला व पुर्णत्वाचा दाखला देणेसाठी स्थळ पाहणी करणे. | ४०,०००/- |
| | विकास परवानगी विभाग | लघुलेखक | ०२ | एच.एस.सी., इंग्रजी आणि मराठी टायपिंग ४० शब्द प्रती मिनीट, इंग्रजी आणि मराठी लघुलेखन अनुक्रमे १००-१२० शब्द प्रती मिनीट आणि एम.एस.सी.आय.टी. | **वयोमर्यादा -** (वय - किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार)<br>**अनुभव -** शासकीय / सेमी शासकीय उपक्रमात किंवा खासगी फर्ममध्ये स्टेनोग्राफर म्हणून किमान ५ वर्षांचा कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>**प्राधिकरण कार्यालयात करावयाच्या कामकाजाचे स्वरूप -**<br>विविध कामकाजाचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन तयार करून सादरीकरण करणे, माहिती अधिकार आणि नागरिकांची सनद संबंधित कामे, सर्व प्रकारचे टाइपिंगचे कामकाज करणे, वरिष्ठ अधिकारी यांचे बैठका व दौऱ्याच्या कार्यक्रमाचे नियोजन करणे, इतर विभाग, कार्यालयांसह समन्वय करणे इ. | २५,०००/- |
| ६ | जमीन व मालमत्ता विभाग | | | | | |

| अ. क्र. | विभागाचे नाव | पदाचे नाव | आवश्यक संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव व कामाचे स्वरूप | वेतन (CTC) |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | अग्निशमन विभाग | उप अग्निशमन अधिकारी | ०२ | **(क)** उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>**(ख)** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा ॲडव्हान्स डिप्लोमा इन फायर इंजिनिअरिंग उत्तीर्ण असावा किंवा मेंबरशिप एक्झामिनेशन (एम.आय.) इन्स्टिट्यूट ऑफ फायर इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) किंवा फेलो मेंबर ऑफ इन्स्टिट्यूट ऑफ फायर | **वयोमर्यादा -** किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वय संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडील प्रचलित नियमानुसार<br>**अनुभव -** १) शासकीय / निमशासकीय / महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या अग्निशमन दलामध्ये अग्निशमन अधिकारी म्हणून १५ वर्षाचा अनुभव आवश्यक त्यापैकी विभागीय अग्निशमन अधिकारी (श्रेणी १) या पदावर किमान ०७ वर्ष काम केलेले असावे<br>**किंवा**<br>**२)** उमेदवारास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ व नियम २००९ विकास नियंत्रण नियमावली तसेच राष्ट्रीय बांधकाम संहितेचे उत्तम ज्ञान असावे. | ३९,३५१/- |
| | | | | इंजिनिअर्स (युनायटेड किंगडम) या संस्थेकडून पदवी प्राप्त केलेली असावी.<br>**(ग)** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी बाबतची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>**(घ)** जड वाहन चालविण्याचा विहित परवाना आवश्यक | **३)** उमेदवाराला शासकीय / निमशासकीय / महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे या संस्थामध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनाचे प्रमाणपत्र देण्याचा व हे काम स्वतंत्रपणे हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>**<u>नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी</u> :-**<br>१) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे,वाचणे व बोलणे)<br>२) **<u>शारिरीक पात्रता</u> :** अग्निशमन दलाच्या प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवारची निरोगी व सुदृढ शरीरयष्टी असावी. | |

| अ. क्र. | विभागाचे नाव | पदाचे नाव | आवश्यक संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव व कामाचे स्वरूप | वेतन (CTC) |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | अग्निशमन विभाग | चालक यंत्र चालक | १० | १. किमान एस.एस.सी. उत्तीर्ण<br>२. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक पाठ्यक्रम पास असावा.<br>३. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>४. वैध जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे. | **वयोमर्यादा -** किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वय संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडील प्रचलित नियमानुसार<br>**शारीरिक पात्रता :**<br>अ) उंची - १६५ से.मी.<br>ब) छाती - साधारण ८१ से.मी. फुगवून ०५ से.मी.जास्त<br>क) वजन - किमान ५० कि.ग्रॅम.<br>ड) दृष्टी - चांगली | २२,८२७/- |
| ९ | अग्निशमन विभाग | अग्निशमन विमोचक | ३० | १. उमेदवार किमान एस.एस.सी. उत्तीर्ण असावा.<br>२.राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा फायरमनचा कोर्स पास असावा.<br>३. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>४. वैध जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.<br>५.एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असावा. | **वयोमर्यादा -** किमान वयाची अट १८ वर्ष पुर्ण व कमाल वय संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडील प्रचलित नियमानुसार<br>**शारीरिक पात्रता :**<br>अ) उंची - १६५ से.मी.<br>ब) छाती - साधारण ८१ से.मी. फुगवून ०५ से.मी.जास्त<br>क) वजन - किमान ५० कि.ग्रॅम.<br>ड) दृष्टी - चांगली | २०७७५/- |

वर नमूद केलेल्या अ.क्र. १ ते ६ पदांसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी walk in interview (मुलाखती) साठी आवश्यक कागदपत्रांसह दि. २०/११/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आणि अ.क्र. ७ ते ९ पदांसाठी दि. २०/११/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता (सदर ७ ते ९ पदांसाठी आवश्यक कागदपत्रे जमा करणेसाठी) स.नं. १५२/१५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे ४ था मजला, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे येथील कार्यालयामध्ये हजर रहावे.

मा. महानगर आयुक्त तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

पुणे
दि. ११/११/२०१९